| MHPU120001922020 | **नियमित दिवाणी दावा क्र.३२/२०२० मधील**<br>**निशाणी क्रमांक २८ वरील आदेश**<br>**( भरत गुलाबराव बोरगे विरुध्द वैशाली भरत बोरगे )** |
|---|---|

प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज त्यांचे विरुध्द झालेला " एकतर्फा ” आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केला आहे. **(यापुढे त्यांचा उल्लेख संक्षिप्तरीत्या प्रतिवादी असा करणेत येईल.)**

**०२.** प्रतिवादी यांचा अर्ज व त्यावरील वादी यांनी दाखल केलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूंनी त्यांच्या अर्जातील कथनाप्रमाणेच युक्तीवाद केलेला आहे.

**०३.** प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, सदरचा दावा हा वादीने ठराव, निरंतर मनाईकरीता दाखल केला आहे. सदर दाव्याचे समन्स प्रतिवादी यांना मिळाले होते. परंतु प्रतिवादी हे कामकाजानिमित्त बाहेरगावी असल्यामुळे तसेच त्यांना कायद्याचे ज्ञान नसल्यामुळे ते न्यायालयात हजर राहिले नाहीत. त्याचप्रमाणे वादी हे प्रतिवादीस दमदाटी करत असल्याने वादीचा राग शांत होईल या आशेने प्रतिवादी हे न्यायालयात हजर राहिले नाहीत. सबब, त्यांच्या विरुध्द दावा एकतर्फा चालविण्याचा आदेश पारित झालेला आहे. सदरचा आदेश रद्द झाल्यास व प्रतिवादीची कैफियत अभिलेखावर आल्यास दावा गुणदोषावर चालण्यास मदत होणार आहे. तसेच प्रतिवादीस संधी दिल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्याचप्रमाणे प्रतिवादी हे जाणुनबुजून गैरहजर राहिलेले नाहीत. त्याचप्रमाणे यापुढे ते दावा चालविण्यास तयार आहेत. सबब, एकतर्फा आदेश रद्द करण्याकरीता त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

**०४.** वादी यांनी नि.३० वर त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध केलेला आहे. वादी यांनी प्रतिवादीच्या अर्जातील सर्व मजकूर नाकारलेला आहे. वादीच्या कथनाप्रमाणे वादी व प्रतिवादी हे पती पत्नी असून त्यांच्यामध्ये मा.दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, पुणे यांच्याकडे घटस्फोटासाठी अर्ज क्र.१९३/२०१९ व ३१७/२०१९ प्रलंबित आहे.

त्याचप्रमाणे मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी कोर्ट क्र.४ येथे देखील याचिका प्रलंबित आहे. उपरोक्त प्रकरणात प्रतिवादी हे उपस्थित राहतात. परंतु प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी हे जाणीवपूर्वक हजर राहत नाहीत. सबब, त्यांच्याविरुध्द एकतर्फा आदेश पारित करण्यात आलेला नाही.

**०५.** वादीच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी यांनी तब्बल पाच वर्षांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. अशा परिस्थितीत त्यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ९ नियम १३ नुसार स्पष्टीकरण देणे आवश्यक आहे. प्रतिवादी यांनी जाणीवपूर्वक निष्काळजीपणा केल्याचे दिसून येते. तसेच अर्जामध्ये कोणतेही सबळ कारण नमूद केले नाही. त्यामुळे सदरचा अर्ज फेटाळण्यास पात्र आहे. त्याचप्रमाणे कायद्याचे अज्ञान हे कारण कायद्यानुसार मान्य नाही. तसेच नोकरी निमित्त बाहेरगावी असल्याबाबत प्रतिवादी यांनी कोणतीही कागदपत्रे दाखल केलेली नाहीत. याउलट केवळ प्रकरण लांबविण्याकरीता प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. सबब, वादी यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

**०६.** अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता, दिनांक ०२/०३/२०२१ रोजी प्रतिवादी यांच्या विरोधात एकतर्फा आदेश पारीत करणेत आलेला आहे. वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादीविरुध्द ठराव व कायम मनाई मिळणेकरीता स्थावर मिळकतीसंदर्भात दाखल केलेला आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ९ नियम ७ अन्वये प्रतिवादीनी मागील अनुपस्थीतीबददल पुरेसे कारण दर्शविल्यास एकतर्फा आदेश रद्द करण्याची तरतूद आहे. सदर तरतूदीच्या अनुषंगाने प्रतिवादीने अर्जात नमूद केलेले कारण विचारात घेता प्रतिवादीस झालेला विलंब हा जाणूबनबुजून असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत नाही. तसेच दाव्याचे स्वरुप पाहता प्रकरण गुणवदोषावर निकाली करणेकरीता प्रतिवादीस त्याच्या बचावाची संधी देणे योग्य व आवश्यक आहे. सदरची संधी दिल्यास वादी यांना कोणतीही तोषीस लागणार नाही. याउलट प्रकरण गुणदोषावर निकाली होणेस मदत होणार आहे. परंतु प्रतिवादीच्या प्रस्तुत अर्जामुळे प्रकरणास विलंब होणार आहे. त्यामुळे काहीअंशी खर्च बसवून प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे योग्य होईल. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

- **आ दे श** -

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांचेविरुध्द दिनांक ०२/०३/२०२१ रोजी पारीत करणेत आलेला एकतर्फा आदेश वादी यांना खर्चादाखल रक्कम रुपये १०००/- पुढील तारखेपर्यंत देण्याच्या अटीवर रद्द करण्यात येत आहे.

SHASHANK DIVAKAR SHIRSAT
Digitally signed by SHASHANK DIVAKAR SHIRSAT
Date: 2026.04.28 16:49:22 +0530

ठिकाण – भोर ( एस.डी.शिरसाट )

दिनांक - २८.०४.२०२६ २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर. भोर.